




Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६५३. वा | मंगळवार | दि. १६ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# सावधान! महाराष्ट्रात वाढतोय कुष्ठरोग ५ वर्षांत ८३ हजारांहून अधिक केसेस...

वृत्तसंस्था/मुंबई

कुष्ठरोग निर्मूलनासाठी विविध पातळ्यांवर आग्रही प्रयत्न होत असले तरीही समाजामध्ये या आजारासंदर्भात असलेली भीती, गैरसमज यामुळे हा आजार आजही संपुष्टात आलेला नाही. करोना संसर्गानंतर या रुग्णसंख्येमध्ये वाढ होताना दिसत आहे. आरोग्यसेवा (कुष्ठरोग आणि क्षयरोग) विभागाने प्रसारमाध्यमांना दिलेल्या माहितीनुसार १ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये ८३,२८१ कुष्ठरुग्णांची नोंद झाल्याचे दिसून आले आहे. यामध्ये पुरुष रुग्णांची संख्या ३८,२०० तर, महिला रुग्णांची संख्या ४५,०८१ आहे. राज्यात एकाही रुग्णांचा यामुळे मृत्यू झालेला नाही.

आरोग्य विभागाच्या सहसंचालक डॉ. सुनीता गोलाइत (कुष्ठरोग आणि क्षयरोग) यांच्याकडे यासंदर्भात विचारणा केली असता, यावर्षी राबवण्यात आलेल्या कुष्ठरुग्ण सर्वेक्षण मोहिमेत यापूर्वी पुढे न येणाऱ्या कुष्ठरुग्णांची नोंद झाल्याचे सांगितले. घरोघरी केलेल्या सर्वेक्षणामुळे हे शक्य झाले. निदान चाचण्या व वैद्यकीय निदाननिश्चितीमुळे कुष्ठरुग्णांचा शोध घेणे शक्य झाले आहे. चंद्रपूर, गडचिरोली, नंदुरबार या भागांप्रमाणे स्थलांतराचे प्रमाण जिथे अधिक आहे तिथेही रुग्णसंख्येमध्ये थोडी वाढ होताना दिसते. दाटीवाटीची लोकसंख्या आणि दारिद्र्य या घटकांचा त्यादृष्टीने विचार करायला हवा याकडे त्यांनी लक्ष वेधले.शहरामध्ये पालिकाक्षेत्रात तर, ग्रामीण भागामध्ये विदर्भातील काही विशिष्ट भागांमध्ये कुष्ठरुग्णांचे प्रमाण वाढताना दिसते. आजाराचा स्वीकार न केल्यामुळे योग्यवेळी औषधोपचार सुरू न करता येणे हे सर्वांत मोठे आव्हान आज आरोग्ययंत्रणेपुढे आहे. महिलांमध्ये या आजाराचा स्वीकार न करण्याचा कल अधिक दिसतो. शून्य कुष्ठरुग्ण संसर्ग ही मोहीम आता अधिक आग्रहीपणे राबवण्यात येणार आहे. कुष्ठरुग्णांना शोधून काढण्यासाठी राज्यात घरोघरी जाऊन सर्वेक्षण मोहीम राबवण्यात आल्याने अधिकाधिक रुग्णसंख्येची नोंद यामध्ये झाली आहे. ही मोहीम राबवली नसती तर रुग्णांची नोंद मोठ्या संख्येने झाली नसती. त्यामुळे रुग्णसंख्येच्या नोंदीमुळे धास्तावण्याचे कारण नाही, याकडे आरोग्य विभागाने लक्ष वेधले आहे.

आरोग्य विभागाच्या कुष्ठरोग व क्षयरोग (आरोग्यसेवा) विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, या आजाराची सांसर्गिक व असांसर्गिक अशी दोन प्रकारांमध्ये विभागणी केली जाते. सांसर्गिक स्वरूपाचा आजार असलेल्या रुग्णांना बारा महिन्यांच्या कालावधीत एमबीएमडीटी व असांसर्गिक रुग्णांवर सहा महिन्यांच्या कालावधीत पीबीएमडीटी हे औषधोपचार केले जातात.कुष्ठरोगाचे निर्मूलन करण्यासाठी आता प्रभावी औषधांची उपलब्धता आहे. या औषधाची मात्रा घेतल्यानंतर कुष्ठरोगामुळे होणारा संसर्ग नियंत्रणात येतो. या रुग्णांना कुटुंबापासून



तसेच समूहापासून वेगळे काढण्याची गरज नाही. त्यांना योग्य उपचाराने पाच महिने ते पाच वर्षे या कालावधीमध्ये कुष्ठरोगमुक्त करता येणे शक्य आहे. या औषधांना कोणत्याही प्रकारचा प्रतिरोध निर्माण झालेला नाही. प्रौढ व मुलांमध्ये वेगवेगळी औषधे दिली जातात. उपचार पूर्ण केले तर आजार पूर्णपणे बरा होतो.चौदा वर्षाखालील मुलांमध्येही कुष्ठरोगाचे प्रमाण पूर्वीच्या तुलनेमध्ये वाढते असून राज्यात वर नमूद केलेल्या कालावधीमध्ये ६०६४ मुलांना कुष्ठरोगाची लागण झाली आहे. त्यात विदर्भ, गडचिरोली, जालना येथील रुग्णसंख्या अधिक आहे.

# तीन लाखांसाठी विवाहितेचा केला शारीरिक व मानसिक छळ...

जनसंचलन/ खामगाव

माहेरातून तीन लाख रुपये आण, अशी मागणी करीत विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी खामगाव तालुक्यातील हिवरा येथील पतीसह त्याच्या कुटुंबातील इतरांविरुद्ध हिवरखेड पोलिसात शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला. यासंदर्भात तालुक्यातील आंबेटाकळी येथे माहेर असलेल्या जयश्री दीपक इंगळे (२६) या विवाहितेने पोलिसात तक्रार दिली. तालुक्यातील हिवरा येथील रहिवासी दीपक आनंदा इंगळे यांच्यासोबत त्यांचा विवाह झाला. त्यानंतर संगनमत करून ७ जून २०२१ ते ३ ऑक्टोबर २०२३ दरम्यान हिवरा येथे सासरची मंडळी पती दीपक आनंदा इंगळे, सासरा आनंदा रामभाऊ इंगळे,



सासू शोभा इंगळे, दीर सतीश आनंदा इंगळे व मनोज आनंदा इंगळे तसेच नणंद लता माणिक लोखंडे (रा. फत्तेपूर, ता. जामनेर, जि. जळगाव, खांदेश) यांनी माहेरवरून ३ लाख रुपये आणण्यासाठी फिर्यादीचा वारंवार शारीरिक व मानसिक छळ केल्याचे म्हटले. दिलेल्या फिर्यादीवरून हिवरखेड पोलिसांनी आरोपीविरुद्ध भादंवि कलम ४९८ अ ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# बुलढाणा येथील शासकीय कृषी महाविद्यालयाच्या प्रशासकीय बांधकामास मंजुरी...

## आमदार संजय गायकवाड यांच्या पाठपुराव्याला यश...

जनसंचलन/बुलढाणा

प्रति वर्ष साठ विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय कृषी महाविद्यालय बुलढाणा येथे होत आहेत. भाऊसाहेब फुंडकर शासकीय कृषी महाविद्यालय म्हणून मान्यता मिळालेल्या या कृषी महाविद्यालयाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सुमारे ९६ कोटी एक लाख ४२ हजार रुपयांची तरतूद करणारा शासन निर्णय कृषी पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांच्याकडून आज १५ जानेवारी रोजी जारी करण्यात आला आहे. बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी शासकीय कृषी महाविद्यालयासाठी सतत केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून बांधकाम लवकरच सुरू होण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहे. प्राप्त झालेल्या सदर शासन निर्णयामध्ये नमूद आहे की डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत बुलढाणा येथील शासकीय कृषी महाविद्यालयाच्या शैक्षणिक व प्रशासकीय इमारती विद्यार्थी विद्यार्थिनी वस्तीगृहे, अधिकारी कर्मचारी निवासी इमारती व्यायामशाळा सभागृह स्पर्टि कॉम्प्लेक्स सुविधा केंद्र व इतर अनुषंगिक बाबींच्या बांधकामाच्या एकूण रुपये ९६०१.४२ लाख इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्यता प्रदान



केल्यामुळे सदर बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. बुलढाणा जिल्हा कारागृहाच्या मागील भागात असणाऱ्या शासकीय जमिनीवर बुलढाणा येथील कृषी महाविद्यालय उभारले जाणार असून मागील वर्षी २८ जून २०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कृषी महाविद्यालय मंजूर करण्यात आले होते.

# युवकांनो शेतीमातीशी नाते तोडू नका- सुनील शेळके...

## उत्स्फूर्त प्रतिसादात राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचा समारोप...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

आजचा युवक नोकरीच्या मागे धावतांना दिसत आहे. स्पर्धेच्या युगात नोकऱ्या मिळणे अवघड झाले आहे. यामधून नैराश्य आणी इतर समस्या वाढल्या आहेत. येणारा काळ कृषीक्षेत्राचा आहे. युवकांनी शेती, शेतीपूरक व्यवसायाची कास धरुन शेतीमातीशी नाते तोडू नये, असे आवाहन अभिता कंपनीचे सीईओ सुनील शेळके यांनी केले. राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त अभिता ॲग्रो इंडस्ट्रीज आणि शासनाचा कृषी विभाग यांच्यावतीने आयोजित अभिता ॲग्रो एक्स्पो राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचा १५ जानेवारी रोजी समारोप झाला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी देविदास ठाकरे होते. यावेळी सुनील शेळके, ॲड. जयश्री शेळके, शिवाजीराजे जाधव, विष्णू मेहेत्रे, फकिरासेठ जाधव, रामदास काळे, शिवप्रसाद ठाकरे, भगवान सावळे, प्रा.कमलेश खिल्लारे, सुरेश हुसे, गजानन मुंढे, पुरुषोत्तम बोर्डे, राहुल झोरे, संजय आडे, रघुनाथ नागरे,चनू देशमुख, सीताराम चौधरी, नंदू वाघमारे, छगन झोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. येथील मातोश्री लॉन्सच्या बाजूला १२ जानेवारी रोजी राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे उदघाटन झाले होते. सोहळ्याला पाच राज्यांतील प्रगतीशील शेतकऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. तत्पूर्वी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील कन्या प्रतीक्षा जायभाये हिच्या हस्ते जिजाऊ जन्मस्थळावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करुन जिजाऊंना मानवंदना देण्यात आली. समारोपीय कार्यक्रमाला राजेश आढाव, विनोद ठाकरे, बाबासाहेब गव्हाड, राजू खरात, शिवाजी गव्हाड, मनोज वाघ, बाळू पवार, राजेश्वर खरात, किशोर खेडेकर,गजानन हनवते, ज्ञानेश्वर जाधव,सारंगधर अंभोरे, विशाल चौधरी, गौतम खरात, अभिमान उगले, गणेश चाटे, विनोद गव्हाड, डॉ.सोळंके यांची उपस्थिती होती. शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, शेतीतील नवनवीन प्रयोग शिकायला मिळावे, प्रगतीशील शेतकऱ्यांपासून प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन घेण्यात आले. कृषी प्रदर्शनात शेतीसंदर्भात विविध प्रकारचे १५० स्टॉल लावण्यात आले होते. जवळपास एक लाख नागरिकांनी स्टॉलला भेटी देऊन माहिती जाणून घेतली. नववर्षात प्रयोगशील शेती करण्याचा संकल्प केला. राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनातील सर्वच उपक्रमांना नागरिकांनी भरभरुन दाद दिली. १२ जानेवारी रोजी पहिल्या दिवशी प्रितम सिंग (हरियाणा), सुरेंद्र अवाना (राजस्थान ), धिरेंद्रकुमार देसाई (गुजरात), सुखजितसिंग भंगु (पंजाब), पांडुरंग पाटील (गोवा ), रवींद्र मेटकर (अमरावती), सुधाकर चौधरी या प्रगतीशील शेतकऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच त्यांचा सन्मान करण्यात आला. १३ जानेवारी रोजी प्रगतिशील शेतकऱ्यांचा सत्कार आणि परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी आयोजित महाराष्ट्राची लोकधारा सांस्कृतिक कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



मिळाला. १४ जानेवारी रोजी आयोजित पशुपक्षी प्रदर्शन पाहण्यासाठी शेतकऱ्यांसह विद्यार्थी आणि नागरिकांची गर्दी झाली होती. पशुपक्षी प्रदर्शनात डोणगाव येथील मुरा जातीचा दोन वर्षीय रेडा युवराज प्रथम बक्षिसाचा मानकरी ठरला. पशुपालक कृष्णा घोगडे यांना प्रथम बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले. तर सिंदखेडराजा येथील राजहंस हर्षवर्धन ढवळे, मो. उस्मान अब्दुल नबी (मुरा म्हैस, दे.राजा), शिवप्रसाद ठाकरे सिंदखेडराजा, अतुल खेकाळे (कुत्रा, सिंदखेडराजा), सुभाष टाकळकर ( गाय - शेळी - सि. राजा), अतुल शिंदे - रेडा, पठार देऊळगाव राजा) या पशुपालकांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले.


मराठा महिला अर्बन

मराठा महिला अर्बन
को-ऑपरेटिक क्रेडीट सोसायटी लि, बुलडाणा

पत्ता. ग्रीन वर्ल्ड नर्सरी जवळ, चिखली रोड, सुंदरखेड, बुलडाणा

पाहिजेत

| अ.क्र. | पदमान | शैक्षणिक अहर्ता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | शाखाधिकारी | पदधिकारी (G.D.C & A) शाखधिकारी पदाचा किमान ५ वर्षांचा अनुभव. | ०१ |
| २ | लिपीक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षांचा अनुभव | ०५ |
| ३ | कर्जअधिक्षक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षांचा अनुभव | ०२ |
| ४ | शिपाई | १० वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०२ |
| ५ | पिगमी एजेन्ट | पदविधर / १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०६ |
| ६ | वाहन चालक | १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०१ |

इच्छुक उमेदवार यांनी आपल्या बायोडाटा / शैक्षनिक कागदपत्रे व पासपोर्ट फोटो सहखालील ई-मेल वर पाठवावा. marathamahilaurban157@gmail.com

तसेच मुलाखतीची वेळ आणि दिनांक संपर्क करुन कळविण्यात येईल

माहितीसाठी संपर्क

सोनु राऊत (हॉटेल मराठा चिखली रोड, बुलडाणा)
मो. ९६२३५ ५३३३३, ९१५८०००१५७ वर कॉल करु शकतात.


## साखरखेर्डा येथे घरफोडी करून चोरट्यांनी दागिने केले लंपास

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

सुमारे महिनाभराच्या विश्रांती नंतर येथील शिक्षक कॉलनीत चोऱ्यांचे सत्र पुन्हा सुरू झाले आहे शिक्षक कॉलनीतील ४ घरांची कुलपे तोडून चोरट्यांनी चोरी करून हजारोंचा ऐवज लंपास केला आहे. ही घटना १४ जानेवारीच्या रात्री घडली शिक्षक कॉलनीत १७ डिसेंबरला रात्री चार ठिकाणी घरफोडी झाली होती. त्यात लाखोंचा ऐवज लंपास करण्यात आला होता. त्या घटनेला महिना होत नाही तोच १४ जानेवारी रोजी रात्री भागवत एकनाथ सोभागे व त्यांच्या घरात भाडेकरू म्हणून राहणारे रवींद्र श्रीराम शेजूळ, वसुदेव महादेव सोळंके व माजी सैनिक संतोषराव संपतराव गायकी यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी हजारो रुपयांचा ऐवज लंपास केला आहे या भागातील नागरिकांनी रात्र गस्तीसाठी एक गुरखा नेमला असून तो गस्तीवर असतानाच आणि गस्तीवर असलेली पोलिस व्हॅन सुद्धा कॉलनीतील रस्त्यावरून पेट्रोलिंग करून आवाज करीत गेली होती त्यानंतर ही चोरीची घटना रात्री १२.०० ते २.०० चे दरम्यान घडली. माजी सैनिक संतोषराव गायकी हे बेडरूममध्ये झोपले असताना त्यांना रात्री २.०० चे सुमारास राहत्या घराच्या बाजूच्या खोलीत खडखडाटाचा आवाज आला. त्यांनी स्वतः च्या बेडरूम उघडून बाहेर जाण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या बेडरूमचे दार बाहेरून बंद केले असल्याचे त्यांना आढळून आले. त्यांनी मागील दरवाजातून गच्चीवर जाऊन चोर आल्याचे इतरांना सांगितले तोपर्यंत चोरट्यांनी पळ काढला त्याच गल्लीत थोड्या अंतरावर भागवत सोभागे व रवींद्र शेजूळ राहतात, त्यांच्या घरांची कुलपे तोडून चोरट्यांनी एक पाच ग्रॅमची अंगठी आणि नगदी पाच हजार रुपये चोरून नेले. चोरटे पुन्हा सक्रीय झाल्याचे चित्र आहे.

## दोन दुचाकींची समोरासमोर धडक होउन अपघात..

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

दोन भरधाव दुचाकींची समोरासमोर धडक झाल्याने दोन युवक गंभीर जखमी झाले. ही घटना देऊळगावराजा ते तुळजापूर रस्त्यावर १४ जानेवारी रोजी सायंकाळी घडली. तुळजापूर येथील विलास काशीनाथ कोल्हे हे दुचाकीने जात होते. दरम्यान, देऊळगावराजा ते तुळजापूर रस्त्यावर समोरून येत असलेल्या दुचाकीने धडक दिली. यामध्ये कोल्हे यांच्यासह समोरच्या दुचाकीवरील लहू चव्हाण (रा. अकोला, देवतांडा) हे गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच १०८ रुग्णवाहिकेने जखमींना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले रुग्णवाहिकेतील डॉक्टर अक्षय गुठे यांनी जखमीला वेळेवर कृत्रिम ऑक्सिजन दिल्याने जालन्यापर्यंत पोहोचले. यावेळी जखमींना ग्रामीण रुग्णालयातील




डॉ. गिरी, डॉ. गुठे, इंगळे ब्रदर, सुरक्षा रक्षक शब्बीर खान, वाहन चालक सुभाष कणखर यांनी मदत केली.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# जिल्हा परिषद शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात साजरा...




**जनसंचलन/ खामगाव**

येथील जिल्हा परिषद शाळेत बाल आनंद मेळावा व गणित बाजार उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना वाव देऊन पाणीपुरी,भेळ,इडली सांबार,पोहे यांसारख्या वेगवेगळ्या पदार्थांचे व भाजीपाला यांचे स्टॉल मांडुन आपल्या कौशल्याने ते विकण्याचा प्रयत्न केला. या मेळाव्यात अनेक पालकांनी,विद्यार्थ्यांनी,शिक्षकांनी, गावकऱ्यांनी अनेक स्टॉलवर जाऊन वेगवेगळ्या पदार्थांची खरेदी करून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत केला.यामधून विद्यार्थ्यांना गणितीय क्रियांचे व व्यवहारिक ज्ञान प्राप्त झाले. यामध्ये सर्वप्रथम शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री सतीश हजारे यांनी फीत कापून कार्यक्रमाचे उद्घाटन केले तसेच मुख्याध्यापक श्री बराटे सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष,उपाध्यक्ष,सर्व सदस्य तसेच सरपंच,उपसरपंच,सर्व ग्रामपंचायत सदस्य,पालक वर्ग व सर्व गावकऱ्यांनी सहकार्य करून कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केला.

# निराधार महिलेला दोन मुलासह मिळाला वृद्धाश्रमात आश्रय...




**जनसंचलन/चिखली**

ऋणानुबंध समाज विकास संस्था द्वारा संचालित तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर येथे बेवारस बेघर निराधार वयोवृद्ध आजी आजोबांना निःस्वार्थ पणे सर्व प्रकारे मोफत सेवा देण सुरु आहे. समाजात ज्यांनी जन्म देऊन हे सुदंर जग दाखवील आज त्या आई वडिलांना सांभाळण्यास लोक टाळाटाळ करीत आहे म्हणून समाज सेवकांनी वृद्धाश्रम सुरु केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून महिलांवर होत असलेले अन्याय अत्याचार मोठया प्रमाणात होताना दिसत आहे. त्यामुळे समाजातिल पीडित महिला आई वडील नाही कोणतेही नातेवाईक सांभाळ करू शकत नाही पतीच्या अन्याय अत्याचार सहन होत नाही त्यामुळे मुलाबलांचा प्रश्न चव्हाट्यावर येतोय म्हणून संस्था द्वारा सुलोचना महिला आश्रम सुरु करण्यात आले आहे या महिला आश्रम मध्ये विधवा, घटस्फोटीत, परितक्ता, पती, सासू सासरे यांच्या पासून होणारे अन्याय अत्याचार पीडित महिलांसोबत त्यांच्या मुलांना सुद्धा चांगले संस्कार व शिक्षण मिळावे यासाठी या महिला आश्रम ची स्थापना करण्यात आली आहे. त्याच अनुषंगाने चिखली तालुक्यातील एक पीडित महिला तिला फिट चा आजार असून तिला एकूण सहा अपत्य आहेत चार अपत्य हे पती जवळ असून आज रोजी दोन सोबत आहे हि महिला दोन महिन्याची गरोदर असतांना तिला तिच्या पतिने दारूच्या व्यसणामुळे अतोनात नरक यातना देऊन घराबाहेर काढून दिले. म्हणून ती माहेरी आली परंतु तिच्या सख्या भावाने सुद्धा सांभाळण्यास नकार दिला त्यामुळे तिच्या आईने तिला मामाच्या घरी नेले त्यानंतर अनेक वेळा तिच्या सासरी पाहुणे व गावातील पंच सोबत नेऊन सुद्धा तिच्या पती व सासू ने तिचा स्वीकार केला नाही उलट तिलाच आर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून माझे चार मुलं माझ्याजवळ आहे हे दोन मुलं माझे नाही कोणाचे आहे त्यांच्याकडे जा असे म्हणून तिच्या चारित्र्या वर शिंतोडे उचलत तिला सर्व पंच कमेटी समोर अपमानित केले.तिने दोन तीन वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. तिचे व तिच्या भावजई चे पटत नसल्याने तिचा सख्खा भाऊ सुद्धा सांभाळू शकत नाही. परंतु तीच्या भावाला तुकाराम आश्रय वृद्धाश्रम ची माहिती मिळताच संपर्क साधला परंतु ती गरोदर असल्यामुळे तिला आश्रम मध्ये सुद्धा सांभाळणं शक्य नव्हते म्हणून तिची प्रसूती झाल्यावर तिचे एक दिड महिन्याचे बाळ व एक दोन अडीच वर्षाचं बाळ सह तिला कायदेशीर बाबी पूर्ण करून अखेर त्या पीडित महिलेला ऍड राजीव जाधव,भाई सिद्धार्थ पैठणे, पत्रकार अप्पू खान व सामाजिक कार्यकर्त्यां सौं रंजना जाधव यांच्या माध्यमातून तुकाराम आश्रय वृद्धाश्रमात आश्रय देण्यात आला. त्या पीडित महिला व तिच्या दोन्ही मुलांची आश्रम च्या वतीने पालन पोषणासह सर्व जबाबदारी स्वीकारण्यात आली आहे या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे तसेच अश्या निराधार विधवा घटस्फोटीत पती च्या व सासरच्या मंडळीने त्रस्त पीडित महिला व बेवारस निराधार वयोवृद्ध कोठे हि आढळून आल्यास तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर येथे संपर्क करावा असे आवाहन संस्थे च्या वतीने प्रशांत डोंगरदिवे यांनी केले आहे.

# १९ जानेवारीला रेल्वे रोको आंदोलन राजधानी व गुजरातकडे जाणाऱ्या गाड्या रोखणार : रविकांत तुपकर...

**जनसंचलन/ बुलढाणा**

मागील अनेक महिन्यापासून आपण शेतकऱ्यांसह रस्त्यावर लढत आहोत. मात्र निवडणूक अभियान राबविणारे मुख्यमंत्री असो वा अन्य सत्ताधारी नेते असो, त्यांना शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी सवड नाही. यामुळे आमचा संयम संपला असून येत्या १९ जानेवारी २०२४ ला रेल्वे रोको आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिला आहे.

प्रसिद्धी माध्यमाशी बोलताना तुपकर यांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त करीत नवीन आंदोलनाची घोषणा केली. यावेळी ते म्हणाले की, बुलढाण्यापुरते सांगायचे झाल्यास जिल्ह्यातील मलकापूर रेल्वे स्टेशन येथे आंदोलन करण्यात येईल. १९ जानेवारीला सकाळी ६ वाजताच आंदोलनाला सुरू करण्यात येणार आहे. यावेळी हजारो पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मुंबई, दिल्ली व गुजरात राज्याकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्या रोखणार आहे. जीव गेला तर चालेल, पण



स्थानकातून एकही रेल्वे सुटू देणार नाही, असे तुपकर यांनी यावेळी सांगितले. या आंदोलनाची कारण मीमांसा सांगताना ते म्हणाले की, मागील ऑक्टोबर महिन्यापासून आम्ही लाखो सोयाबिन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी विविध टप्प्यात आंदोलने करीत आहे. एल्गार मोर्चा, रथयात्रा, मंत्रालय ताब्यात घेणे, अन्नत्याग आदी आंदोलनाच्या माध्यमाने आम्ही राज्य व केंद्र शासनाकडे मागण्या रेटल्या. सोयाबिन, कपाशीला दरवाढ, यलो मोझाक, लाल्या, बोण्ड अळीमुळे झालेली नुकसानीची भरपाई, पीकविमा, नैसर्गिक आपत्तीची भरपाई, सोयापेंड, पामतेल आयात बंद करावी या मागण्यांना राज्य व केंद्राने मान्यता दिली. मात्र कारवाई शून्य असून शेतकऱ्यांना कवडीची मदत मिळाली नाही. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. शेतकरी चोहोबाजूंनी संकटात सापडला असताना मुख्यमंत्री शिवसंकल्प अभियान राबवून लोकसभेची तयारी करीत आहे. त्यांना शेतकऱ्यांचे अश्रू पुसायला वेळ नाही की मदतीसाठी त्यांच्याजवळ पैसा नाही, असे विचित्र चित्र आहे. आता शेतकऱ्यांचा संयम संपल्याने रेल्वे रोको करण्यात येत आहे. सरकारला आम्ही १८ जाने वारीची मुदत दिली आहे. त्या मुदतीत मदत मिळाली नाही तर आंदोलन अटळ असल्याचे तुपकर यांनी स्पष्ट केले.

# चैतन्य इंग्लिश मिडीयम स्कूल येथे राजमाता माँ साहेब जिजाऊ जयंती साजरी!



**जनसंचलन/ खामगाव**

रामनगर येथील चैतन्य इंग्लिश मिडीयम स्कूल, येथे हिंदवी स्वराज्य संकल्पिका राजमाता माँ साहेब जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कु कृष्णाली लोखंडकार, कु ईश्वरी दुतोंडे, कु पूर्वी खेकडे, कु सेजल हिवराळे, कु परी खेकडे, कु आचल खेकडे, कु नव्या साबे, कु श्रद्धा खेकडे या विद्यार्थिनींनी हिंदवी स्वराज्य संकल्पिका राजमाता माँ साहेब जिजाऊ यांच्या जीवनावर, कार्यावर प्रकाश टाकला. माँ साहेब जिजाऊ याचं हिंदवी स्वराज्य निर्मितीत छत्रपती शिवरायांना मार्गदर्शन, उत्कृष्ट नियोजन, संभाषण कौशल्य यासह अनेक धाडसी निर्णय व आपल्या मातृतीर्थ बुलडाणा जिल्ह्याचं वैभव असलेला सिंदखेड राजा माँ साहेबांचं बालपण याची माहिति विद्यार्थ्यांना दिली. यासह कु अनुष्का खेकडे, कु नंदनी कवडकार, कु शुकण्या भोसले, कु कनिष्का कवडकार, कु अनुष्का भिसे, कु स्नेहा शेगोकार, कु माही हिवराळे, कु प्राची खेकडे, कु प्रणाली पवार, कु आचल खेकडे, कु नव्या साबे, कु शेजल हिवराळे, कु परी खेकडे, कु रिया खेकडे, कु श्रद्धा खेकडे, कु दुर्वा कवडकार, कु मृणाली लोखंडकार, कु शिवानी सुळोकार, कु पूर्वा टेकाडे या विद्यार्थिनींनी माँ साहेब जिजाऊ यांची वेशभूषा साकारली होती. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक एन.डी. इंगळे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विधानसभा अध्यक्षांच्या निकालामुळे सुप्रीम कोर्टाचा अवमान, ठाकरे गटाची पुन्हा न्यायालयात धाव...

वृत्तसंस्था/मुंबई

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ठाकरे आणि शिंदे अशा दोन्ही गटातील आमदारांना पात्र ठरवलं, परंतु खरी शिवसेना म्हणून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील पक्षाला मान्यता दिली. या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहे. उद्धव ठाकरे यांनी नार्वेकरांच्या निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. विधानसभा अध्यक्षांच्या निकालामुळे सुप्रीम कोर्टाचा अवमान झाल्याचं ठाकरे गटाने ऑनलाईन दाखल केलेल्या याचिकेत म्हटलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने मे २०२३ मध्ये शिवसेना आमदार अपात्रता प्रकरण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सोपवलं होतं. मर्यादित कालावधीत याबाबत निकाल देण्याचे आदेशही दिले होते. मात्र ही सुनवाणी अखंडित होऊ शकली नाही.सुनावणी वेगवान व्हावी आणि लवकर निकाल लागावा, यासाठी ठाकरे गटाने त्यावेळी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर कोर्टाने विधानसभा अध्यक्षांना मर्यादित काळात निकाल देण्याचे आदेश दिले. दोन्ही गटांचे युक्तिवाद ऐकून ३१ डिसेंबरपर्यंत निकाल लागणे अपेक्षित होते. परंतु, राहुल नार्वेकरांनी पुन्हा वेळ वाढवून मागितला आणि अखेर दहा जानेवारीला निकालाचे वाचन केले. राहुल नार्वेकरांनी २०१९ मधील शिवसेनेची घटनादुरुस्ती अवैध ठरवत उद्धव ठाकरेंचं पक्षप्रमुख पदच अमान्य केलं. तसंच, १९९९ ची पक्षघटना आणि बहुमताच्या आधारे शिंदे गटच खरी शिवसेना असल्याचा निकाल दिला. शिंदे गटातील १६ आमदार पात्र ठरवलेच, परंतु ठाकरे गटाच्याही १४ आमदारांना पात्र करण्यात आले, हा आश्चर्याचा धक्का मानला गेला.विधानसभा अध्यक्षांच्या




निकालातून न्याय मिळाला असल्याचं वाटत नसल्यास याचिकाकर्ते पुन्हा सर्वोच्च न्यायालयात दाद मागू शकतात, असं कोर्टानेच नार्वेकरांकडे जबाबदारी सोपवताना सांगितलं होतं. त्यानुसार, उद्धव ठाकरे गटाने पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाची दारं ठोठावली आहेत.

## मंत्री हसन मुश्रीफ, खासदार भावना गवळी यांच्यावरील भ्रष्ट्राचाराच्या आरोपांचे काय झाले?- किरीट सोमय्या

वृत्तसंस्था/पुणे

भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी अजित पवार गटाचे नेते, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, शिंदे गटाच्या खासदार भावना गवळी यांच्यासह अनेकांवर भ्रष्ट्राचाराचे आरोप केले.
भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी अजित पवार गटाचे नेते, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, शिंदे गटाच्या खासदार भावना गवळी यांच्यासह अनेकांवर भ्रष्ट्राचाराचे आरोप केले.
त्यानंतर मुश्रीफ हे शिवसेना-भाजपच्या सरकारमध्ये मंत्री झाले. तर, गवळी या शिंदे यांच्या शिवसेनेत गेल्या. पुढे त्यांच्या चौकशा संथ झाल्याचे दिसते. पिंपरी-चिंचवडमध्ये किरीट सोमय्या आले असता त्यांना याबाबत विचारले. त्यावर किरीट सोमय्या म्हणाले की, ज्या-ज्या माझ्या तक्रारी झाल्या. त्यामध्ये १०० टक्के तथ्य आढळले, खऱ्या निघाल्या. ३९ घोटाळे मी बाहेर काढले. त्या सगळ्याची चौकशी पुढे झाली. कोणाची मालमत्ता यंत्रणांनी जप्त केली. कुठे चौकशी, गुन्हे दाखल झाले आहेत. मंत्री हसन मुश्रीफ यांचे प्रकरण न्यायालयात चालू आहे. मुश्रीफ यांची न्यायालयीन लढाई सुरू आहे. पुढचा निर्णय न्यायालयाने घेणे अपेक्षित आहे. न्यायालयापर्यंत पोहचविण्याचे माझे काम आहे. न्यायालयात जा-



वून काळा कोट घालून मी उभा राहू शकत नाही. भावना गवळी यांची सव्वा आठ कोटींची मालमत्ता आयकर विभागाने जप्त केली असल्याचेही किरीट सोमय्या म्हणाले. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिकेतील कथित हस्तांतरित विकास हक्क (ॲम्युनिटी टीडीआर) घोटाळ्याबाबत हा माझा विषय नाही म्हणत किरीट सोमय्या यांनी बोलण्याचे टाळले.

## मद्यधुंद चालकाने त्याचे ताब्यातील वाहनाने एकास उडविले...

जनसंचलन/ अमडापूर

मद्यधुंद चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून एकास उडविल्याची घटना १२ जानेवारी रोजी येथील बसस्थानकासमोर घडली. याबाबत शेख कडून शेख हबीब रा. इसोली ता. चिखली यांनी येथील पोस्टेत फिर्याद दिली की, माझा भाचा शेख अनिस शेख नाजू हा स्थानिक बसस्थानकाजवळ असलेल्या महावितरण ऑफिसकडे जात होता. दरम्यान भरधाव वेगाने मागून येणाऱ्या विनानंबरच्या वाहनाने माझ्या भाच्यास उडविले. त्यामुळे शेख अनिस शेख नाजू हा जखमी झाला. या फिर्यादवरुन सदर आर-




ोपी चालक विनायक वासुदेव टिकार रा. टेंभूर्णा ता. खामगाव याच्याविरुध्द अमडापूर पोस्टेत अप.क्र.५२४ कलम २७९, ३३७ भादंवि सहकलम १८५, १३४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय निवृत्ती चेके करीत आहेत.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

## गांजाची लागवड १० झाडांसह ३ किलो जप्त नांदूरा पोलिसांची कारवाई

जनसंचलन/ नांदुरा

प्रतिबंधित गांजाची शेतात लागवड करून विक्री होत असल्याच्या माहितीवरून नांदुरा पोलिसांनी रविवारी सकाळी तालुक्यातील टाकळी वतपाळ येथे छापा टाकत शेतातील गांजाची दहा झाडे तसेच आरोपीच्या घरातून ३ किलो गांजा जप्त करून आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी टाकळी वतपाळ येथे छापा टाकला. त्यावेळी गावातील वसंत बिसन पाखरे (६०) याने त्याच्या शेतात प्रतिबंधित अंमली पदार्थ गांजाची झाडे लावल्याचे दिसून आले. यावेळी शेतातील १० गांजाची झाडे तसेच राहत्या घरातही ३ किलो गांजा किंमत ३० हजार रूपये आढळून आला. आरोपी त्याची विक्री करीत असल्याने पोलिसांनी त्याच्याविरुद्ध एनडीपीएस ॲक्टचे कलम ८.२० अन्वये गुन्हा नोंदवला. तसेच त्याला अटक केली आहे. ही कार्यवाही पोलिस निरीक्षक विलास पाटील, पो. हवालदार मिलिंद जवंजाळ, मपोहवा




कल्पना गिरी, पोकों सुरडकर, सुनील सुशीर, राहुल ससाने, विनायक मानकर, पंकज डाबेराव, मपोकॉं दीपा सुरडकर यांनी केली. गांजा या प्रतिबंधित पदार्थाची खरेदी विक्री करू नये, असे पोलिसांनी सांगितले.